**शासकीय गृहनिर्माण योजनेतील घर धारण करित असलेल्या व्यक्तीस त्या किंवा अन्य कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत दुसरे घर अनुज्ञेय न करण्याबाबतचे धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्र. याचिक-२०१९/ प्र.क्र.६६/ गृनिप**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक:- ११ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना-

मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या फौजदारी जनहित याचिका क्र. ३८ / २०१८ मध्ये झालेल्या सुनावणीच्या वेळी शासनाचे मा. महा अधिवक्ता यांनी संपुर्ण राज्यात एका व्यक्तीस फक्त एकच शासकीय घर / सदनिका अनुज्ञेय करणारे धोरण आणण्यास शासन ईच्छुक असल्याचे निवेदन दि.४ मे, २०१८ रोजी मा. उच्च न्यायालयात केले होते. सदर याचिकेत, मा. उच्च न्यायालयाने दि. १९-१०-२०१८ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णयाला/आदेशांना अनुसरुन संपुर्ण राज्यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या किंवा त्यांच्या कुटूंबियाच्या नावे कोणत्याही शासकीय योजनेतील मालकी हक्काचे घर/ सदनिका असल्यास त्याला अथवा त्याच्या कुटूंबियाना शासनाच्या त्या किंवा अन्य कोणत्याही योजनेत घर/ सदनिका वाटप/ वितरीत करण्यास प्रतिबंध करण्याबाबतचे धोरण आणण्याचे शासनाच्या विचाराधिन होते.

## शासन निर्णय :-

उपरोक्त पार्श्वभूमीवर, शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

१. या धोरणामध्ये जेथे "कुटुंब" असा उल्लेख आलेला असेल तेथे "कुटुंब" म्हणजे संबधित व्यक्तीची पत्नी/पती तसेच त्याची/तिची अज्ञान मुलगा/मुलगी असे अभिप्रेत आहे.

२. राज्यातील एखादी व्यक्ती किंवा त्याचे किंवा तिचे कुटुंबातील कोणतीही व्यक्ती, राज्यातील कोणत्याही भागात महाराष्ट्र शासनाच्या किंवा शासन अधिनस्त कोणत्याही प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत त्याला मालकी तत्वावर वाटप झालेले/ वितरित झालेले घर/ सदनिका धारण करत असेल तर यापुढे, अशा व्यक्तीस किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबियांना

राज्यामध्ये कोठेही राज्य शासनाच्या/ शासन अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या, त्या किंवा अन्य कोणत्याही गृहनिर्माण योजनेत शासकीय योजनेतील दुसरे घर/ सदनिका, वाटप/ वितरीत करता येणार नाही.

३. खालील शासकीय योजना उपरोक्त प्रयोजनार्थ शासकीय गृहनिर्माण योजना समजण्यात येतील तसेच सदर योजनेत मुळ लाभार्थ्यास मिळालेली घरे/ सदनिका/ निवासी गाळे शासकीय योजनेतील घरे समजण्यात येतील.

अ) शासनाकडुन किंवा अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थाकडुन राबविण्यात येणा-या सर्वसाधारण/ विशेष गृहनिर्माण योजना (ज्यामध्ये सोडतीद्वारे किंवा सोडत न काढता राबविलेल्या सर्व योजनांचा समावेश राहील.)

ब) शासनाकडुन किंवा शासन अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थाकडुन संस्थेला किंवा वैयक्तिक स्वरुपात सवलतीच्या दरात मालकी स्वरुपात किंवा भाडे पट्ट्याने वितरित केलेल्या जमिनीवर बांधण्यात आलेली घरे/ सदनिका

क) केंद्र शासन/ राज्य शासनाकडुन अनुदान प्राप्त गृहनिर्माण / आवास योजना

ड) शासनाच्या स्वेच्छाधिकार कोट्यातील (२ % , ५% इत्यादि.) घरे/ सदनिका

ई) झोपडपट्टी पुनर्वसन योजना

४. एखाद्या व्यक्ती किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबियाच्या नावे मालकी अथवा भाडेदारी तत्वावर एक किंवा अधिक घरे/सदनिका असल्यास व शासनाकडून किंवा शासन अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडुन सदर घर/ सदनिका असलेल्या वसाहती/ इमारती/चाळींचा पुनर्विकास करण्यात येऊन संबधित व्यक्तीस अथवा कुटुंबियास पुनर्वसित इमारतीत मोफत किंवा सवलतीच्या दरात एक किंवा अनेक घरे/सदनिका मिळत असल्यास त्यासाठी या धोरणामुळे प्रतिबंध होणार नाही.

परंतू, अशा पुनर्वसन योजनेमुळे मोफत किंवा सवलतीच्या दरात घर /सदनिका प्राप्त झाल्यामूळे, त्यानंतर शासनाच्या किवा शासन अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अन्य कोणत्याही शासकीय योजनेत सदर व्यक्ती वा त्याच्या कुटुंबियास घर अथवा सदनिका अनुज्ञेय होणार नाही.

५. तथापि, शासनाच्या / शासन अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थाच्या गृहनिर्माण योजनेत मालकी हक्काने स्वत:च्या किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबियाच्या नांवे घर/ सदनिका धारण केलेल्या व्यक्तीस अथवा त्याच्या/ तिच्या कुटुंबियाना, शासनाच्या / शासन अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आणखी चांगल्या गृहनिर्माण योजनेत घर/ सदनिका घ्यावयाची असल्यास (up-gradation to better tenement), त्याचे किंवा त्याच्या कुटूंबियाचे नावे असलेले शासकीय योजनेतील आधीचे घर/

सदनिका शासन किंवा संबंधित प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्था निश्चित करेल त्या किंमतीस शासनास/ शासनाच्या संबधित प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्थेस परत करणे अनिवार्य राहील.

६. त्याचप्रमाणे स्वत:च्या किंवा त्याच्या/ तिच्या कुटुंबियाच्या नांवे शासकीय योजनेतील घर/ सदनिका धारण करणा-या व्यक्तीस, सध्या धारण करत असलेल्या घर/ सदनिकेपेक्षा मोठे घर / सदनिका शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माण योजनेत घ्यावयाची असल्यास सुद्धा त्याचे किंवा त्याच्या कुटूंबियाचे नावे असलेले शासकीय योजनेतील आधीचे घर/ सदनिका शासन किंवा संबधित प्राधिकरण निश्चित करेल त्या किंमतीस शासनास/ शासनाच्या संबधित प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेस परत करणे अनिवार्य राहील.

७. वरील अ. क्र. ५ व ६ येथील प्रकरणात शासनास/ शासनाच्या संबधित प्राधिकरणास / स्थानिक स्वराज्य संस्थेस परत करावयाच्या घराचे/ सदनिकेचे संबंधित व्यक्तीस अदा करावयाचे मुल्य, शासकीय योजनेतील संबंधित घर/सदनिका ज्या प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडून वितरित केले होते, त्या प्राधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेकडून निश्चित करण्यात यावे. तथापि, अशा रितीने परिगणित केलेले मुल्य सदनिकेच्या / घराच्या मुळ किंमतीपेक्षा (ज्या किंमतीस मुळ सदनिकाधारकास शासन किंवा प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडून सदर घर / सदनिका वितरित करण्यात आली असेल ती किंमत) कमी असता कामा नये. परंतु सध्याच्या बाजार भावापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

८. वरील अ.क्र. ५ व ६ येथील प्रकरणात शासकीय योजनेत व्यक्ती अथवा कूटुंबियांच्या नावे आधीपासून घर असलेल्या/ धारण करत असलेल्या व्यक्ती अथवा त्यांच्या कुटुंबियाने प्रकरणपरत्वे अधिक चांगल्या योजनेतील घरासाठी किंवा मोठ्या आकाराच्या घरासाठी अर्ज करताना स्वत:च्या अथवा कूटुंबियाच्या नावे असलेल्या शासकीय योजनेतील घर/सदनिकांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. या बाबतची अट शासनाने/संबधित प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्थेने योजनेच्या अटी/ शर्तीमध्ये तसेच अर्ज नमुन्यामध्ये अंतर्भूत करणे अनिवार्य आहे. तसेच या अनुषंगाने अर्जासोबत किंवा पात्रता निश्चितीच्यावेळी अर्जदार किंवा त्यांचे कुटूंबियाकडे शासकीय घर/ सदनिका असल्या/नसल्याबाबतचे शपथपत्र घेण्यात यावे. त्याचप्रमाणे संबंधित अर्जदाराकडून त्याचा व त्याच्या कुटुंबियांचा आधारकार्डांचे क्रमांक घेण्यात यावे.

९. वरील अ.क्र. ५ व ६ येथील प्रकरणात, संबधित व्यक्ती नविन योजनेकरिता घर / सदनिका मिळण्यास अन्यथा पात्र ठरल्यास उपरोक्त अ.क्र. ५ व ६ येथे नमूद केल्याप्रमाणे सदर व्यक्ती/कूटुंबियाच्या नावे असलेले शासकीय योजनेतील घर/ सदनिका त्यांनी शासनास/ शासनाच्या संबधित प्राधिकरणास/ स्थानिक स्वराज्य संस्थेस परत करणे आवश्यक राहील. अन्यथा शासकीय योजनेतील नविन घराचा/

सदनिकेचा ताबा संबंधित व्यक्तीस देण्यात येणार नाही. या प्रयोजनार्थ संबधित व्यक्तीस पुरेसा कालावधी देणे आवश्यक आहे. सदर कालावधी खालीलप्रमाणे असावा :-

अ) अर्जदार अन्यथा पात्र असल्यास ज्या योजनेत त्याला नविन घर/ सदनिका मिळणार आहे, त्या योजनेशी संबधित प्राधिकरणाने/स्थानिक स्वराज्य संस्थेने, संबधित अर्जदारास त्याचे सध्या धारण करित असलेले शासकीय योजनेतील घर / सदनिका ज्या प्रधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेकडून घेतले असेल त्यांना परत करण्याची कार्यवाही करण्याकरिता २ महिन्याचा कालावधी देणे आवश्यक आहे. सदर कालावधीस मुदतवाढ देण्याबाबत संबधित प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या स्तरावर निर्णय घेऊ शकेल.

ब) संबधित व्यक्तीने सध्या ताब्यात असलेले घर/ सदनिका परत घेण्याची विनती केल्यानंतर संबधित शासन/ प्राधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेने सदर घराची मुल्य निश्चिती करुन ती संबधित व्यक्तीस अदा करणे व घर ताब्यात घेण्याची कार्यवाही १ महिन्यात पुर्ण करणे अनिवार्य राहील. यासाठी वेळ लागत असल्यास, सदर प्राधिकरणाने/ स्थानिक स्वराज्य संस्थेने तसे लेखी स्वरुपात अर्जदारास तसेच नविन घर/ सदनिका वितरित करणा-या प्राधिकरणास कळविणे आवश्यक आहे व नविन घर/ सदनिका वितरीत करणा-या प्राधिकरणाने/ स्थानिक स्वराज्य संस्थेने त्याप्रमाणे उचित मुदत वाढ देणे आवश्यक आहे.

१०. वरील अ.क्र. ५ व ६ येथील प्रकरणात, शासकीय योजनेत व्यक्ती अथवा कूटुंबियाच्या नावे आधीपासून घर असलेल्या/ धारण करत असलेल्या व्यक्ती अथवा त्यांच्या कुटुंबियाने प्रकरणपरत्वे शासकीय योजनेतील अधिक चांगल्या योजनेतील घरासाठी किंवा मोठ्या आकाराच्या घरासाठी अर्ज केल्यानंतर त्याचे पहिले घर/ सदनिका शासनास/संबधित प्राधिकरणास/ स्थानिक स्वराज्य संस्थेस परत करण्याऐवजी बाजार भावाने विकल्यास/नातेवाईकांच्या वा इतर व्यक्तीच्या नावे बक्षीस म्हणून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरित केल्याचे शासनाच्या/संबंधित प्राधिकरणाच्या/ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निदर्शनास आल्यास संबधित व्यक्ती त्यानंतर, शासकीय योजनेतील नविन घर/ सदनिकेचे वाटप करण्यास अपात्र ठरेल. तसेच नविन घराचा/ सदनिकेचा ताबा संबधित व्यक्तीस देण्यात येणार नाही.

११. हे धोरण पुर्वलक्षी प्रभावाने लागू होणार नाही. तथापी, हे धोरण अंमलात येण्यापुर्वीच्या ज्या प्रकरणात शासन/ प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून मंजुर करण्यात आलेल्या/ राबविण्यात आलेल्या एखाद्या शासकीय गृहनिर्माण योजनेत सदस्यांची पात्रता निश्चित करण्यात आलेली असेल व अद्याप प्रत्यक्ष ताबा दिलेला नसेल अशा प्रकरणातही या धोरणाच्या तरतूदी लागू होतील. अशा प्रकरणी संबधित शासन/ प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेने अर्जदाराकडुन सदर घराच्या किमतीपोटी किंवा

अन्य कारणास्तव आधीच काही रक्कम स्विकारली असल्यास सदर रक्कम सदर अर्जदारास परत करणे आवश्यक आहे.

१२. एखाद्या व्यक्तीच्या किंवा कूटुंबियाच्या नावे आधीपासुन शासकीय योजनेतील घर/ सदनिका असताना, सदर व्यक्ती अथवा त्यांच्या कुटुंबियाने ही बाब शासन/ शासनाचे संबधित प्राधिकरण/ स्थनिक स्वराज्य संस्था यांच्यापासून लपवून/ चुकीची माहिती देऊन, हे धोरण अंमलात आल्याच्या दिनांकानंतर त्या अथवा अन्य कोणत्याही शासकीय योजनेत नविन घर/ सदनिका मिळवून त्याचा ताबा घेतला, असे शासनाच्या/शासनाचे संबधित प्राधिकरण/ स्थनिक स्वराज्य संस्था यांच्या निदर्शनास आल्यास, त्या व्यक्तीच्या नावे वाटप/वितरित करण्यात आलेले नविन घर/ सदनिकेचे वितरण रद्द करण्यात येईल व त्या व्यक्तीकडुन शासन किंवा संबधित शासकीय प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्था सदर नविन घर/ सदनिका परत घेईल.

१३. शासनाच्या या धोरणातील तरतूदी विचारात घेउन शासनाच्या संबधित विभागानी/ संबधित प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांच्या कायदा/नियम/धोरणामध्ये, आवश्यकतेनुसार, सुधारणा/ बदल करण्याची कार्यवाही तातडीने करावी.

१४. सदरहू धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणीबाबत स्पष्टीकरण/मार्गदर्शन करण्याचे अधिकार शासनाच्या गृहनिर्माण विभागास राहतील.

१५. हा शासन निर्णय राज्य शासनाच्या गृहनिर्माण योजनांशी संबंधित विविध प्रशासकीय विभाग, वित्त विभाग, विधी व न्याय विभाग यांनी दिलेले अभिप्राय विचारात घेऊन राज्य मंत्रीमंडळाने दि. ०९.०९.२०१९ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन, निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१११४५६५१४८०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Bharose M U

Digitally signed by Bharose M U
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=f3abf3ab8b16dfec487f18ce64d6b0ab8e38d8925d44d15f7dbd61babb4ae6df,
serialNumber=8b015b0d7afaa0db7c0603c5c954e6816492dbb5f94ab286da7f224853a4eebf, cn=Bharose M U
Date: 2019.09.11 15:32:38 +05'30'

**(मुं. उ. भरोसे)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई (पत्राने)

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२

४) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

५) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

६) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन,मुंबई.

७) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य,

८) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

९) सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव

१०)उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर

१३) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई./ महाराष्ट्र-२, नागपूर

१४) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई

१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१६)गृहनिर्माण विभागातील सह सचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी.

१७) निवड नस्ती.